# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
## पिंपरी ४११०१८.
### जाहिरात क्रमांक - १८४/२०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील गट 'ब' व गट 'क' संवर्गातील खालील प्रमाणे नमूद केलेल्या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी, प्रस्तुत जाहिरातीत खाली नमूद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचे दिनांक | १९/०८/२०२२ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०८/०९/२०२२ वेळ सांय ६.०० पर्यंत |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | ०८/०९/२०२२ वेळ सांय ६.०० पर्यंत |
| ४ | ऑनलाईन परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या ०७ दिवस आधी |
| ५ | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | ऑक्टोबर २०२२ (संभाव्य) |

**पदनाम,पदसंख्या व आरक्षण तपशिल :-**

| अ. क्र. | पदनाम | गट | पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ.जा. | अ.ज. | वि जा (अ) | भ ज (ब) | भ ज (क) | भ ज (ड) | वि मा प्र | इ मा व | ई डब्ल्यु एस | खुला (अराखीव) |
| | | | | | S.C | S.T. | V J (A) | N T (B) | N T (C) | N T (D) | S B C | O B C | E W S | Open |
| १ | अतिरिक्त कायदा सल्लागार | ब | ०१ | सर्वसाधारण आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| २ | विधी अधिकारी | ब | ०१ | सर्वसाधारण आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ३ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | ब | ०१ | सर्वसाधारण आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ४ | विभागीय अग्निशमन अधिकारी | ब | ०१ | सर्वसाधारण आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ५ | उद्यान अधिक्षक(वृक्ष) | ब | ०१ | सर्वसाधारण आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ६ | सहाय्यक उद्यान अधिक्षक | क | ०२ | सर्वसाधारण आरक्षण | १ | - | - | - | - | - | - | १ | - | - |
| | | | | एकूण | १ | - | - | - | - | - | - | १ | - | - |
| ७ | उद्यान निरिक्षक | क | ०४ | सर्वसाधारण आरक्षण | - | - | १ | | | | - | १ | १ | १ |
| | | | | एकूण | - | - | १ | | | | - | १ | १ | १ |
| ८ | हॉर्टीकल्चर सुपरवायझर | क | ०८ | सर्वसाधारण आरक्षण | १ | १ | १ | | | | - | १ | १ | २ |
| | | | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | एकूण | १ | १ | १ | | | | - | १ | १ | ३ |
| ९ | कोर्ट लिपिक | क | ०२ | सर्वसाधारण आरक्षण | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | एकूण | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| १० | ॲनिमल किपर | क | ०२ | सर्वसाधारण आरक्षण | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | एकूण | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ११ | समाजसेवक | क | ०३ | सर्वसाधारण आरक्षण | - | - | - | - | - | - | - | १ | १ | १ |
| | | | | एकूण | - | - | - | - | - | - | - | १ | १ | १ |

| अ.क्र. | पदनाम | गट | पदसंख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ.जा. | अ.ज. | वि जा (अ) | भ ज (ब) | भ ज (क) | भ ज (ड) | वि मा प्र | इ मा व | ई डब्ल्यु एस | खुला (अराखीव) |
| | | | | | S.C | S.T. | V.J (A) | N T ( B) | N T ( C) | N T (D) | S B C | O B C | E W S | Open |
| १२ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | क | ४१ | सर्वसाधारण आरक्षण | १ | २ | १ | १ | १ | - | - | २ | २ | ५ |
| | | | | महिला(३०%) | २ | १ | - | १ | १ | - | - | ३ | १ | ४ |
| | | | | माजी सैनिक(१५%) | १ | - | - | - | - | - | - | २ | १ | २ |
| | | | | अंशकालीन उमेदवार(१०%) | १ | - | - | - | - | - | - | १ | - | १ |
| | | | | प्रकल्पग्रस्त(५%) | - | - | - | - | - | - | - | १ | - | १ |
| | | | | खेळाडू(५%) | - | - | - | - | - | - | - | १ | - | १ |
| | | | | एकूण | ५ | ३ | १ | २ | २ | - | - | १० | ४ | १४ |
| १३ | लिपिक | क | २१३ | सर्वसाधारण आरक्षण | ५ | ५ | १ | १ | २ | ४ | १ | १३ | ८ | २९ |
| | | | | महिला(३०%) | ४ | ५ | १ | १ | ३ | २ | २ | १२ | ७ | २८ |
| | | | | माजी सैनिक(१५%) | २ | २ | - | - | २ | १ | १ | ६ | ३ | १४ |
| | | | | अंशकालीन उमेदवार(१०%) | १ | २ | - | - | १ | १ | १ | ४ | २ | ९ |
| | | | | प्रकल्पग्रस्त(५%) | १ | १ | - | - | १ | - | - | २ | १ | ५ |
| | | | | भूकंपग्रस्त(२%) | - | - | - | - | - | - | - | १ | - | २ |
| | | | | खेळाडू(५%) | १ | १ | - | - | १ | - | - | २ | १ | ५ |
| | | | | अनाथ(१%) | - | - | - | - | - | - | - | - | - | २ |
| | | | | **एकूण रिक्त पदांपैकी ०८ पदे दिव्यांगांकरीता आरक्षित असतील.** | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | १४ | १६ | २ | २ | १० | ८ | ५ | ४० | २२ | ९४ |
| १४ | आरोग्य निरिक्षक | क | १३ | सर्वसाधारण आरक्षण | १ | - | - | - | १ | - | १ | १ | १ | १ |
| | | | | महिला(३०%) | १ | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |
| | | | | माजी सैनिक(१५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | अंशकालीन उमेदवार(१०%) | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | **एकूण रिक्त पदांपैकी ०१ पद दिव्यांगांकरीता आरक्षित असतील.** | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | २ | - | - | - | १ | - | १ | २ | २ | ५ |
| १५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | क | ७५ | सर्वसाधारण आरक्षण | १ | १ | २ | १ | १ | १ | १ | ५ | ४ | ११ |
| | | | | महिला(३०%) | २ | १ | २ | - | - | - | - | ४ | २ | ११ |
| | | | | माजी सैनिक(१५%) | १ | - | १ | - | - | - | - | २ | १ | ५ |
| | | | | अंशकालीन उमेदवार(१०%) | १ | - | १ | - | - | - | - | १ | १ | ४ |
| | | | | प्रकल्पग्रस्त(५%) | - | - | - | - | - | - | - | १ | - | २ |
| | | | | भूकंपग्रस्त(२%) | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | | खेळाडू(५%) | - | - | - | - | - | - | - | १ | - | २ |
| | | | | **एकूण रिक्त पदांपैकी ०३ पदे दिव्यांगांकरीता आरक्षित असतील.** | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | ५ | २ | ६ | १ | १ | १ | १ | १४ | ८ | ३६ |
| १६ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | क | १८ | सर्वसाधारण आरक्षण | २ | - | - | १ | - | १ | १ | २ | २ | २ |
| | | | | महिला(३०%) | १ | - | - | - | - | - | - | १ | १ | १ |
| | | | | माजी सैनिक(१५%) | - | - | - | - | - | - | - | १ | - | १ |
| | | | | अंशकालीन उमेदवार(१०%) | - | - | - | - | - | - | - | १ | - | - |
| | | | | एकूण | ३ | - | - | १ | - | १ | १ | ५ | ३ | ४ |

१.पदनाम,वेतनश्रेणी व नेमणूकीची अर्हता

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | नेमणूकीकरिता अर्हता |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त कायदा सल्लागार<br>पे लेवल S-२६<br>र.रु. ४४९००-१४२४०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील विधी पदवीधर आवश्यक.<br>२) दिवाणी व फौजदारी न्यायालयातील किमान ०७ वर्षे स्वतंत्र वकिल म्हणून काम केल्याचा अनुभव आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| २ | विधी अधिकारी<br>पे लेवल S-२५<br>र.रु. ४१८००-१३२३०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील विधी पदवीधर आवश्यक<br>२) दिवाणी व फौजदारी न्यायालयातील किमान ०५ वर्षे स्वतंत्र वकिल म्हणून काम केल्याचा अनुभव आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ३ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी<br>पे लेवल S-२०<br>र.रु. ५६१००-१७७५०० | १) कोणत्याही शाखेचा पदवीधर आवश्यक.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेकडील पदवी (बी.ई. फायर) धारण केलेली किंवा राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा डिव्हीजनल फायर ऑफीसर पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकीमधील प्रगत पदविका) किंवा दि इन्स्टीट्युशन ऑफ फायर इंजिनिअर्स (युनायटेड किंगडम) या संस्थेकडील सदस्यत्व (एम.आय. फायर) किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर दी इन्स्टीट्युशन ऑफ फायर इंजिनिअर्स (युनायटेड किंगडम) चे सदस्यत्व असावे.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. ४) शारिरीक पात्रता- उंची १६५ सें.मी.,(महिलांसाठी उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.) छाती साधारण ८१ सें.मी. फुगवुन ०५ से.मी.जास्त, वजन ५० कि.ग्रॅ., दृष्टी-चांगली ५) उपमुख्य अग्निशमन अधिकारी किंवा तत्सम पदावरील किमान ०५ वर्ष सलग सेवा झालेली असावी.<br>६) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक.<br>७) संचालक,महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून वेळोवेळी विहीत करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू राहतील. |
| ४ | विभागीय अग्निशमन अधिकारी<br>र.रु. ९३००-३४८००<br>ग्रेड पे रु. ४६००<br>(सहाव्या वेतन आयोगानुसार) | १) कोणत्याही शाखेचा पदवीधर आवश्यक.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेकडील पदवी (बी.ई. फायर) धारण केलेली किंवा राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा डिव्हीजनल फायर ऑफीसर पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकीमधील प्रगत पदविका) किंवा दि इन्स्टीट्युशन ऑफ फायर इंजिनिअर्स (युनायटेड किंगडम) या संस्थेकडील सदस्यत्व (एम.आय. फायर) किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर दी इन्स्टीट्युशन ऑफ फायर इंजिनिअर्स (युनायटेड किंगडम) चे सदस्यत्व असावे.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>४) शारिरीक पात्रता- उंची १६५ सें.मी.,(महिलांसाठी उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.) छाती साधारण ८१ सें.मी. फुगवुन ०५ से.मी.जास्त, वजन ५० कि.ग्रॅ., दृष्टी-चांगली<br>५) विभागीय अग्निशमन अधिकारी किंवा तत्सम पदावरील किमान ०५ वर्ष सलग सेवा झालेली असावी.<br>६) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक.<br>७) संचालक,महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून वेळोवेळी विहीत करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू राहतील. |
| ५ | उद्यान अधिक्षक (वृक्ष)<br>पे लेवल S-२५<br>र.रु. ४१८००-१३२३०० | १) मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाकडील बी.एस्सी.(हॉर्टीकल्चर / फॉरेस्ट्री) ही पदवी असणे आवश्यक.<br>२) शासकीय, निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था अथवा नामांकित संस्थांमधील उद्यानातील पर्यवेक्षकीय कामाचा ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ६ | सहाय्यक उद्यान अधिक्षक<br>पे लेवल S-१३<br>र.रु. ३५४००-११२४०० | १) मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाकडील बी.एस्सी.(हॉर्टीकल्चर / फॉरेस्ट्री) ही पदवी असणे आवश्यक.<br>२) शासकीय, निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था अथवा नामांकित संस्थांमधील उद्यानातील पर्यवेक्षकीय कामाचा ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ७ | उद्यान निरिक्षक<br>पे लेवल S-१०<br>र.रु. २९२००-९२३०० | १) मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाकडील बी.एस्सी.(हॉर्टीकल्चर / फॉरेस्ट्री) ही पदवी असणे आवश्यक.<br>२) शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा नामांकित कंपन्यामधील उद्यानातील पर्यवेक्षकीय कामाचा ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ८ | हॉर्टीकल्चर सुपरवायझर<br>पे लेवल S-१०<br>र.रु. २९२००-९२३०० | १) मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाकडील बी.एस्सी.(हॉर्टीकल्चर / फॉरेस्ट्री) ही पदवी असणे आवश्यक<br>२) शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा नामांकित कंपन्यामधील उद्यानातील पर्यवेक्षकीय कामाचा ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ९ | कोर्ट लिपिक<br>पे लेवल S-६<br>र.रु. १९९००-६३२०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील विधी शाखेतील पदवीधर आवश्यक.<br>२) शासनाकडील मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. मराठी टंकलेखनाचा वेग ३० आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० श.प्र.मि.<br>३) वरिष्ठ वकीलांकडील कोर्ट कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>४) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | नेमणूकीकरिता अर्हता |
|---|---|---|
| १० | अॅनिमल किपर<br>पे लेवल S-३<br>र.रु. १६६००-५२४०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पशुवैद्यकीय पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) प्राणी संग्रहालयाचे ठिकाणी किमान ०५ वर्षे कामाचा अनुभव आवश्यक .<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ११ | समाजसेवक<br>पे लेवल S-१३<br>र.रु. ३५४००-११२४०० | १) एम.एस.डब्ल्यु.ही पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक.<br>२) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| १२ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक<br>पे लेवल S-६<br>र.रु. १९९००-६३२०० | १)शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार.<br>२) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| १३ | लिपिक<br>पे लेवल S-६<br>र.रु. १९९००-६३२०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२) शासनाची मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. मराठी टंकलेखनाचा वेग ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० श.प्र.मि. असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| १४ | आरोग्य निरिक्षक<br>पे लेवल S-८<br>र.रु. २५५००-८११०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक.<br>२) शासनमान्य संस्थेकडील स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| १५ | कनिष्ठ अभियंता(स्थापत्य)<br>पदविकाधारक पे लेवल S-१४<br>र.रु. ३८६००-१२२८००<br>पदवीधारक पे लेवल S-१५<br>र.रु. ४१८००-१३२३०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका आवश्चक.<br>२) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| १६ | कनिष्ठ अभियंता(विद्युत)<br>पदविकाधारक<br>पे लेवल S-१४<br>र.रु. ३८६००-१२२८००<br>पदवीधारक<br>पे लेवल S-१५<br>र.रु. ४१८००-१३२३०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका आवश्यक.<br>२) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |

**२.दिव्यांग आरक्षण**

दिव्यांग आरक्षणाबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.अपंग-२००४/५५/आ-२.दि.२७/७/२००४, नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००४/६३९/प्र.क्र.९६/न.वि.-६,दि.११/०२/२००९, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दि.२९ मे २०१९ व शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. दिव्यांग २०२१/प्र.क्र.३३/नवि-२८, दि.१६/४/२०२१ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गत करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

| पदनाम | कर्तव्ये/जबाबदारी | अपेक्षित शारिरीक क्षमता/पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| लिपिक | महानगरपालिकेतील लिपिक संवर्गाची सर्व कर्तव्ये पार पाडणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे | S, ST, W, BN, RW, SE,H, C, MF | a. B, LV<br>b. D, HH<br>c. OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>d. ASD (M,MoD) ID, SLD, MI<br>e. MD involving (a) to (d) above |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | महानगरपालिकेतील स्थापत्यविषयाची कामे करणे, कार्यरत क्षेत्रात विकास कामाअंतर्गत सर्वेक्षण करणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाचे बांधकाम संकल्प चित्रानुसार होत आहे किंवा नाही याची देखरेख व नियंत्रण, कामांचा दर्जा तपासणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे. | S, ST, W, BN, MF RW, SE, H, C | a) LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, 3L, Dw, AAV,<br>d) SLD, MI<br>e) MD- involving (a) to (d) above. |
| आरोग्य निरिक्षक | महानगरपालिका क्षेत्रामध्ये साफसफाईची कामे करुन घेणे, कामांवर सनियंत्रण ठेवणे, विविध सफाई अभियानांमध्ये सामील होणे. त्याची अंमलबजावणी करणे. महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे. | S, ST, W, BN, RW, SE, H, C | a) B, LV<br>b) D, HH.<br>c) OA, OL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above. |

FUNCTIONAL REQUIREMENT ABBREVIATIONS USED- S-Sitting, ST – Standing, W – Walking, BN – Bending, L-Lifting, KC-Kneeling & Crouching, JU-Jumping, CRL-Crawling, CL-Climbing, PP-Pulling & Pushing, MF – Manipulation with fingers, RW – Reading and Writing, SE – Seeing, H – Hearing, C – Communacation,

CATEGORY ABBREVIATIONS USED- B – Blind, LV - Low Vision, D – Deaf, HH – Hard of Hearing, OA – One arm, OL – One Leg, BA – Both arms, BL – Both Leg, OAL – One Arm and One Leg, BLOA-Both Leg & One Arm, BLA- Both Legs Arms, CP – Cerebral Palsy, LC – Leprosy Cured, Dw – Dwarfism, AAV – Acid Attack Victims, MDy – Muscular Dystrophy, ASD Autism Spectrum Disorder (M-Mild, MoD-Moderate), ID-Intellectual Disability, SLD-Specific Learning Disability, MI-Mental ilness, MD- Multiple Disabilities

२.१ अपंग कल्याण आयुक्तालय यांचे दि.२० डिसेंबर २००६ चे परिपत्रकानुसार तसेच शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन परिपत्रक क्र.न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क.२, दि.१८/०३/२०१४ अन्वये शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबीं संदर्भात व्यवस्था करण्यास परवानगी घेता येईल. त्याकरिता परीक्षेचे वेळी सहाय्यक उपलब्ध करुन देण्याबाबत उमेदवाराने परीक्षेच्या १५ दिवस अगोदर सहाय्यक आयुक्त,प्रशासन,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे अपंगत्वाच्या प्रमाणपत्रांसह सुस्पष्ट लेखी मागणी करणे आवश्यक आहे. अशी सहाय्यकाची मागणी न केल्यास ऐनवेळी सहाय्यकाची मदत घेता येणार नाही व याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार चालणार नाही.

**२.२ लेखनिक वापरणा-या दिव्यांग व्यक्तिंसाठी मार्गदर्शक तत्वे**

दृष्टिहीन उमेदवार आणि उमेदवार यांच्या लेखनाच्या गतीवर कोणत्याही कारणास्तव कायमस्वरुपी प्रतिकूल परिणाम होत आहे, ते ऑनलाईन परीक्षेंदरम्यान त्याच्या स्वतःच्या लेखनिकाचा वापर करु शकतात. खाली दिलेल्या (ii) आणि (iii) मर्यादेच्या अधीन राहून.

• उमेदवाराला त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.

• उमेदवाराने नेमलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखकाच्या सेवासाठी पात्र असलेल्या आणि वापरु इच्छिणा-या उमेदवारांनी काळजीपूर्वक सूचित केले पाहिजे. त्यानंतरची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही.

• एका उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करणा-या व्यक्तीस दुसन्या उमेदवारासाठी लेखनिक काम करता येणार नाही.

• लेखनिक कोणत्याही शैक्षणीक प्रवाहातील असू शकतो. तथापी. विशेष तज्ञ अधिका-यांच्या पदासाठी लेखनिक हा त्या पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक प्रवाहातील असावा.

• उमेदवार आणि लेखनिक या दोघांनाही उचित हमीपत्र द्यावे लागेल की लेखनिकाने वर नमुद केलेल्या लेखनिकेसाठी सर्व विहित पात्रता निकषांची पूर्तता केली आहे. पुढे जर नंतर असे आढळून आले की त्याने/तिने ठरवून दिलेली कोणतीही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा भौतिक तथ्ये दडवली आहेत. तर ऑनलाइन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता, अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

• जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात ते परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी किंवा अन्यथा सल्यानुसार २० मिनिटांच्या भरपाईच्या वेळेसाठी पात्र असतील.

• लेखनिकाने स्वतःहून उत्तर देऊ नये. असे कोणतेही वर्तन आढळल्यास उमेदवारी रद्द केली जाईल.

• फक्त सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांनाच अशी परवानगी दिली जाईल कारण उमेदवारांना दिलेला सवलतीचा वेळ प्रणालीवर आधारित असेल. जर त्यांनी/तिने त्यासाठी नोंदणी केली नसेल तर चाचणी आयोजित करणा-या यंत्रणेला अशी सवलत देणे शक्य होणार नाही.सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी न केलेल्या उमेदवारांना अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.

• परीक्षेदरम्यान, कोणत्याही टप्प्यावर, लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, परिक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. जर चाचणी प्रशासक कर्मचा-यांनी परीक्षेनंतर लिखित प्रश्नांची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल दिला गेला तर अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.

(iii) लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रल पाल्सी (locomotor disability and cerebral palsy) असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे लोकोमोटर डिसॅबिलिटी आणि सेरेब्रल पल्सीबाबत कार्यक्षमता कमी होण्याच्या मर्यादेपर्यत (किमान ४०% दिव्यांग) असेल अश्या उमेदवारांसाठी प्रति तास वीस मिनिटे किंवा सवलतीचा वेळ अनुज्ञेय असेल.

(iv) दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे

• दृष्टीहीन उमेदवार (ज्यांना ४०% पेक्षा कमी अपंगत्व आहे) चाचणीची सामग्री वर्धित (मॅग्निफाइड) फॉन्टमध्ये पाहण्याची निवड करू शकतात आणि असे सर्व उमेदवार प्रत्येक तासासाठी २० मिनिटांच्या भरपाई वेळेसाठी पात्र असतील.

• जे उमेदवार परीक्षेसाठी लेखनिकाली सेवा वापरतात, परीक्षेतील मजकूर आवर्धित फॉन्टमध्ये पाहण्याची सुविधा दृष्टीहीन उमेदवारांना ही मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी मार्गदर्शक तत्त्वे/स्पष्टीकरण जर काही असतील, त्यानुसार बदलू शकतात.

• ज्या उमेदवारांना परीक्षेच्या दिवशी सहाय्यकाची मदत पुर्रावण्यात आली आहे.अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनीटे अतिरिक्त वेळ दिला जाईल. तथापी अशा उमेदवारांने परीक्षेच्या वेळी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

३.वयोमर्यादा :-

| वयोमर्यादा गणना दिनांक | वयोमर्यादा | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किमान खुला/ मागासवर्गीय अनाथ | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | दिव्यांग माजी सैनिक, भूकंपग्रस्त,प्रकल्पग्रस्त | | दिव्यांग उमेदवार | अंशकालीन उमेदवार |
| | | खुला | मागासवर्गीय/ अनाथ | खुला | मागासवर्गीय | खुला | मागासवर्गीय | | |
| अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४५ | ४५ | ४५ | ५५ |

| | |
|---|---|
| ३.१ | अ.क्र.१ ते २ व ५ ते १६ या पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांना शासन निर्णय क्र.एसआरव्ही/२०१५/प्र.क्र.४०४/कार्या १२. दि.२५/०४/२०१६ नुसार किमान वयोमर्यादा १८ वर्ष राहील तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील.प्रकल्पग्रस्त,भुकंपग्रस्त यांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.अनाथ व खेळाडू उमेदवारास कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |
| ३.२ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी व विभागीय अग्निशमन अधिकारी ह्या पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांना किमान वयोमर्यादा १८ वर्षे राहील तसेच सर्व प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे इतकी राहील. |
| ३.३ | शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ, दि.१६/०६/२००१ नुसार दिव्यांग उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. |
| ३.४ | दिव्यांग माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/ १०/१६अ, दि.२०/०८/२०१० प्रमाणे वयाची कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. |
| ३.५ | सामान्य प्रशासन विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६अ. दि.२०/०८/२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेत सवलत- उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ०३ वर्षे इतका राहील. |
| ३.६ | सामान्य प्रशासन विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.०६/१०/२०१० अन्वये स्वातंत्र सैनिकांचे पाल्य यांचे वय ४५ वर्षे इतके राहील. |
| ३.७ | सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.अशंका१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दि.०२/०१/२०१९ अन्वये पदवीधारक/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवार यांचे कमाल वयोमर्याद ४५ वर्षे इतके राहील. |
| ३.८ | शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही/२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दि.०१/११/२००३ नुसार ज्या पदांसाठी अनुभव आवश्यक आहे,अशा पदांसाठी शासकीय/निमशासकीय सेवेत आस्थापनेवर कार्यरत असलेल्या उमेदवारांना वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८+५=४३वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३+५=४८ वर्षे राहील. |
| ३.९ | उपरोक्त नमूद वयोमर्यादा अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास विचारात घेतली जाईल. |

४.परिक्षा शुल्क

| | |
|---|---|
| ४.१ | मागास प्रवर्गातील उमेदवारांनी र.रु.८००/- व अमागास/खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी र.रु.१०००/- याप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जाईल. |
| ४.२ | उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परिक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील |
| ४.३ | माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क माफ राहील. |
| ४.४ | विहित कार्यपध्दतीने नमूद केलेल्या मुदतीत परिक्षा शुल्क महानगरपालिकेस प्राप्त न झाल्यास अशा उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज अपात्र समजण्यात येतील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. |

५. पदाची कर्तव्य व जबाबदा-या

| | |
|---|---|
| ५.१ | निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागात/क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आवश्यकतेनुसार करण्यात येईल. उमेदवाराने नेमून दिलेले कामकाज व संबंधित अन्य कामकाज करणे बंधनकारक राहील. |

६.ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत

| | |
|---|---|
| ६.१ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. |
| ६.२ | उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक Online अर्जामध्ये नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. |
| ६.३ | ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन अर्ज भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वतः भरावे लागतील. |
| ६.४ | ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरीता "New User Registration" यावर क्लिक करुन नाव, संपर्काची माहिती, भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी नमूद करुन "Submit" बटन दाबावे त्यानंतर उमेदवाराच्या भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी वर OTP येईल सदर OTP |

| | |
|---|---|
| | टाकल्यानंतर Log-in Id व Password, email id द्वारे प्राप्त होईल तद्नंतर सदर Log-in Id व Password वापरून उमेदवाराला अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरू करता येईल. |
| ६.५ | ऑनलाईन अर्ज भरून झाल्यानंतर Save करावा. त्यानंतर Print वर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा. जर अर्जामध्ये काही सुधारणा करावयाची असेल तर Edit करून माहितीमध्ये आवश्यक सुधारणा करावी. |
| ६.६ | आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच छायाचित्र व स्वाक्षरी योग्य रितीने अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन "Submit & Pay" बटनवर क्लिक करून परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे. |
| ६.७ | उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वतःबाबतची माहिती अचूक रितीने भरावी. तसेच विहित आकारातील स्वतःचे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पध्दतीने भरल्यानंतर अर्ज स्वीकृत होईल. एकदा शुल्क भरणा केल्यानंतर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. |
| ६.८ | Candidates who want to apply for Multiple posts can "Submit & Pay" the fees for Single Application first & then can click on "+" button in "Apply Post" Section to apply for other posts using same Registration Number. |
| ६.९ | उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी आल्यास **+91 7353293111** या दूरध्वनी क्रमांकावर किंवा pcmchelpdesk2022@gmail.com या ई-मेलवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. |

**७.ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पध्दत**

| | |
|---|---|
| ७.१ | ऑनलाइन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह(Payment Gateway)एकत्रित करून उपलब्ध करून देण्यात आला आहे. |
| ७.२ | परीक्षा शुल्क इंटरनेट बॅकींग किंवा क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्ड इ.द्वारे भरता येईल. |
| ७.३ | ऑनलाईन शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर ऑनलाईन अर्जाची प्रत Download करून त्याची प्रत (Printout) ठेवणे आवश्यक आहे. |

**८.फोटो व स्वाक्षरीबाबत सूचना**

| | |
|---|---|
| ८.१ | उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो अपलोड करावा. |
| ८.२ | उमेदवाराने फोटो काढताना फ्लॅशचा वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ८.३ | उमेदवार चष्मा वापरत असल्यास डोळे दिसतील अशा प्रकारचा फोटो असावा.फोटोमध्ये टोपी, गॉगल,मास्क यांनी चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ८.४ | उमेदवाराने स्कॅन केलेले छायाचित्र हे 50 – 80 kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी. |
| ८.५ | Online Application वर ज्या ठिकाणी स्वाक्षरी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करावी. सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराची स्वत:चीच असणे आवश्यक आहे. |
| ८.६ | उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढ-या कागदावर स्वाक्षरी करुन ती अपलोड करावी. |
| ८.७ | उमेदवाराने स्कॅन केलेली स्वाक्षरीची ईमेज ही 50 – 80 kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी. |

**९. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-**

| | |
|---|---|
| ९.१ | उमेदवारांनी विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाऊन सविस्तर जाहिरात अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती स्वत:कडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच उमेदवाराने ऑनलाईल अर्ज भरुन सादर करावा. |
| ९.२ | विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. |
| ९.३ | महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहीरातीचा संदर्भ व अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेला अंतिम दिनांक इत्यादी तपशील आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावा. तसेच महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी लगत पूर्वीच्या नियोक्त्याचे ना हरकत प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे. |
| ९.४ | अर्ज करणा-या उमेदवारांनी दि.०८/०९/२०२२ पर्यंत, ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हता धारण करणे/अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. |
| ९.५ | उमेदवारास एका पदाकरीता फक्त एकाच आरक्षणामधून अर्ज करणे बंधनकारक राहील. |
| ९.६ | अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या |

| | |
|---|---|
| | प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना असतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. |
| ९.७ | वय, शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग/क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक,अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन उमेदवार, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/ निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केले नंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| ९.८ | वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल. |
| ९.९ | शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल. उमेदवारांचे गुणपत्रिकेत श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी किंवा परिक्षेच्या अंतिम गुणांची टक्केवारी नमूद असलेला संबंधित विद्यापीठ/मान्यता प्राप्त संस्थेकडील अधिकृत दाखला (लेटरहेडवर) प्रमाणित केलेला असावा, तो कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| ९.१० | ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना कागदपत्रांच्या छाननीशिवाय ऑनलाईन परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार ऑनलाईन परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा. |

**१०.परीक्षा / निवड पध्दती :-**

| | |
|---|---|
| १०.१ | जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या परीक्षा घेणे सोईस्कर नसल्यास परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/ अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/ अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे निकष निश्चित करुन अंतिम परीक्षेस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. |
| १०.२ | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२२/ प्र.क्र.५४/का.१३- अ, दि. ०४/०५/२०२२ अन्वये सदर पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही. |
| १०.३ | ऑनलाईन परीक्षेस उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी (परीक्षेचा निकाल) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. |
| १०.४ | ऑनलाईन परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ तसेच बैठक व्यवस्था याची माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.तसेच अर्ज केलेल्या उमेदवारांस त्यांनी अर्जत नमूद केलेल्या ई-मेल वर स्वतंत्र प्रवेशपत्र (Admit Card) पाठविणेत येणार आहे.परीक्षेचे प्रवेश पत्र (Admit Card) मनपा संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. भरती प्रक्रियेसंदर्भातील इतर सर्व माहिती व त्यानुषंगाने होणा-या बदलांबाबतची सर्व माहिती केवळ महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.या व्यतिरिक्त कोणत्याही माध्यमांद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही,याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| १०.५ | समान गुण असणा-या उमेदवारांचा गुणवत्ता क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२२/ प्र.क्र.५४/का.१३ अ, दि. ०४/०५/२०२२ मधील निकषावर लावला जाईल. |
| १०.६ | गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. |
| १०.७ | परीक्षेच्या वेळी उमेदवाराने ओळखपत्र पुरावा(आधारकार्ड,पॅन कार्ड,ड्रायव्हींग लायसन्स) सोबत आणणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. |
| १०.८ | ऑनलाईन परिक्षेनंतर उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| १०.९ | भरतीबाबत ऑनलाईन परीक्षा जोपर्यंत आयोजित केली जात नाही तोपर्यंत उमेदवाराने महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील अद्ययावत (Updates) माहिती वेळोवेळी पाहणे आवश्यक आहे. |
| १०.१० | सरळसेवा भरतीकरिता घेण्यात येणा-या ऑनलाईन परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी/फेरतपासणी केली जाणार नाही. अथवा यासंदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| १०.११ | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२२/ प्र.क्र.५४/का.१३- अ, दि. ०४/०५/२०२२ अन्वये ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरीता बोलावण्यात येईल. कागदपत्रे पडताळणीनंतर उमेदवारांची अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी (जातीनिहाय तसेच समांतर आरक्षण निहाय) शासन शुध्दीपत्रक क्र. संकिर्ण -१११८/प्र.क्र.३९/ १६-अ, दि.१९/१२/२०१८ अन्वये प्रसिध्द करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| १०.१२ | उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे. आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे. ते आजमावणेकरिता परिक्षेच्या वेळी विचारण्यात येणा-या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबरच ज्या पदासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाच्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल. |
| १०.१३ | ऑनलाईन परिक्षा केंद्रांची संभाव्य शहरे खालीलप्रमाणे आहेत. उमेदवारांनी ऑनलाईन फॉर्म भरताना त्यांचे पसंतीनुसार तीन परीक्षा केंद्रांची निवड करावी. तथापी एखाद्या पदास अधीक संख्येने अर्ज आल्यास,उमेदवारांची संख्या विचारात घेऊन त्यांना त्यांचे पसंतीनुसार परीक्षा केंद्र उपलब्ध न झाल्यास महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या परीक्षा केंद्रांवर परीक्षा देणे बंधनकारक राहील.<br>**परीक्षा केंद्राची संभाव्य शहरे**- पुणे, मुंबई, औरंगाबाद, अहमदनगर,अमरावती, नाशिक, सातारा,जळगाव,लातूर,सोलापूर, नागपूर, कोल्हापूर, नांदेड |
| १०.१४ | जाहिरातीमधील कोणत्याही पदासाठी जर जास्त अर्ज प्राप्त झाले तर परिक्षा वेगवेगळ्या सत्रांमध्ये घेतली जाईल. परिक्षांची काठीण्य पातळी तपासून गुणांकन करताना Mean Standard Deviation Method या पध्दतीने Normalisation करण्याचा Formula उमेदवारांच्या माहितीकरीता देण्यात येत आहे.<br>$\widehat{M}_{ij} = \frac{\overline{M}^g_t - M^g_q}{\overline{M}_{ti} - M_{iq}} (M_{ij} - M_{iq}) + M^{gm}_q$<br>Where:<br>$\widehat{M}_{ij}$ = Normalized marks of $j^{th}$ candidate in the $i^{th}$ shift.<br>$\overline{M}^g_t$= is the average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (number of candidates will be rounded-up).<br>$M^g_q$= is the sum of mean and standard deviation marks of the candidates in the examination considering all shifts.<br>$\overline{M}_{ti}$= is the average marks of the top 0.1% of the candidates in the $i^{th}$ shift (number of candidates will be rounded-up).<br>$M_{iq}$= is the sum of mean marks and standard deviation of the $i^{th}$ shift.<br>$M_{ij}$= is the actual marks obtained by the $j^{th}$ candidate in $i^{th}$ shift.<br>$M^{gm}_q$= is the sum of mean marks of candidates in the shift having maximum mean and standard deviation of marks of candidates in the examination considering all shifts.<br>Calculation of marks will be done up to 5 decimal places. |

## ११. परिक्षेचे स्वरुप

गट ब व गट क मधील पदांसाठी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास ती खालीलप्रमाणे राहील.परीक्षेसाठी मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान, बुध्दीमत्ता चाचणी या विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील. १०० प्रश्न वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ)स्वरुपाचे असून प्रत्येक प्रश्नास ०२ गुण असतील.(एकूण गुण २००) परिक्षेसाठी एकत्रितपणे १२० मिनिटांचा कालावधी अनुज्ञेय राहील. परीक्षा ही वरील गट ब व गट क मधील पदांची शैक्षणिक अर्हता,भाषा,सामान्यज्ञान,बुध्दीमत्ता चाचणी, तांत्रिक ज्ञान इत्यादीशी संबंधित राहील. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२२/ प्र.क्र.५४/का.१३- अ, दि. ०४/०५/२०२२ नुसार ऑनलाईन परिक्षेचे स्वरुप असेल.

| पदनाम | विषय(प्रश्न संख्या) | दर्जा | माध्यम | प्रश्न संख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अतिरिक्त कायदा सल्लागार<br>विधी अधिकारी | मराठी (१५)<br>इंग्रजी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बोध्दीक चाचणी (१५) | उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान (१२वी) | मराठी व इंग्रजी | ६० | १२० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| कोर्ट लिपिक | विधी संबंधित (४०) | विधी शाखेच्या पदवी परिक्षेच्या दर्जासमान | इंग्रजी | ४० | ८० | | |
| उप मुख्य अग्निशमन अधिकारी | मराठी (१५)<br>इंग्रजी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बोध्दीक चाचणी (१५) | उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान (१२वी) | मराठी व इंग्रजी | ६० | १२० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| विभागीय अग्निशमन अधिकारी | अग्निशमन संबंधित (४०) | अग्निशमन शाखेच्या पदवी परिक्षेच्या दर्जासमान | | ४० | ८० | | |

| पदनाम | विषय(प्रश्न संख्या) | दर्जा | माध्यम | प्रश्न संख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उद्यान अधिक्षक(वृक्ष)<br><br>सहाय्यक उद्यान अधिक्षक<br><br>उद्यान निरिक्षक<br><br>हॉल्टीकल्चर सुपरवायझर | मराठी (१५)<br>इंग्रजी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बौध्दीक चाचणी (१५) | उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान (१२वी) | मराठी व इंग्रजी | ६० | १२० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | हॉर्टीकल्चर /फॉरेस्ट्री संबंधित (४०) | हॉर्टीकल्चर /फॉरेस्ट्री पदवी परिक्षेच्या दर्जासमान | | ४० | ८० | | |
| ॲनिमल किपर | मराठी (१५)<br>इंग्रजी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बौध्दीक चाचणी (१५) | माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान (१०वी) | मराठी व इंग्रजी | ६० | १२० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | पशुवैद्यकीय संबंधित (४०) | पशुवैद्यकीय पदवीका परिक्षेच्या दर्जासमान | | ४० | ८० | | |
| लिपिक | मराठी (२५)<br>इंग्रजी (२५)<br>सामान्य ज्ञान (२५)<br>बौध्दीक चाचणी (२५) | उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान (१२वी) | मराठी व इंग्रजी | १०० | २०० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| समाजसेवक | मराठी (१५)<br>इंग्रजी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बौध्दीक चाचणी (१५) | उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान (१२वी) | मराठी व इंग्रजी | ६० | १२० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | समाजसेवक अभ्यासक्रमाशी संबंधित (४०) | समाजसेवक शाखेच्या पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या दर्जासमान | | ४० | ८० | | |
| आरोग्य निरिक्षक | मराठी (१५)<br>इंग्रजी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बौध्दीक चाचणी (१५) | उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान (१२वी) | मराठी व इंग्रजी | ६० | १२० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | स्वच्छता/आरोग्य संबंधित (४०) | स्वच्छता निरिक्षक परिक्षेच्या दर्जासमान | | ४० | ८० | | |
| स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | मराठी (१५)<br>इंग्रजी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बौध्दीक चाचणी (१५) | माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान (१०वी) | मराठी व इंग्रजी | ६० | १२० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | तांत्रिक विषयाशी संबंधित (४०) | स्थापत्य अभियांत्रिकी पाठ्यक्रम परिक्षेच्या दर्जासमान | | ४० | ८० | | |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)<br><br>कनिष्ठ अभियंता (विद्युत) | मराठी (१५)<br>इंग्रजी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बौध्दीक चाचणी (१५) | उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान (१२वी) | मराठी व इंग्रजी | ६० | १२० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | अभियांत्रिकी विषयाशी संबंधित (४०) | पदवी/पदविका परिक्षेच्या दर्जासमान | | ४० | ८० | | |

**१२. सामाजिक व समांतर आरक्षणाबाबत :-**

| | |
|---|---|
| १२.१ | जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतरमागास वर्ग, विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| १२.२ | उमेदवाराने अर्जामध्ये जातीचा व जात प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. |
| १२.३ | विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग प्रवर्गाकरीता दावा करणा-या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| १२.४ | खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी त्या क्रिमिलेअर प्रवर्गातील महिला नसल्याचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| १२.५ | महीलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये महाराष्ट्राचा अधिवास (Domisile) असल्याबाबत तसेच नॉन क्रिमिलेअरमध्ये मोडत असलेबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. |
| १२.६ | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे शासनाने जाहीर केलेल्या सक्षम अधिका-याचे **दि. ३१/०३/२०२३** पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येईल. सदर प्रमाणपत्र सादर करु न शकणारे उमेदवार समांतर तसेच मागासप्रवर्गातील आरक्षणाचा (सामाजिक आरक्षण) लाभ घेण्यास अपात्र होतील. |
| १२.७ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ("ईडब्ल्युएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दि.३१/०५/२०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| १२.८ | इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरीता विचार केला जाणार नाही. सदर आरक्षण विषयक नियम हे केवळ महाराष्ट्र राज्यात अधिवास करणा-या उमेदवारांनाच लागू आहे. त्याकरीता उमेदवाराने कागदपत्रे पडताळणीचेवेळी अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| १२.९ | विवाहित स्त्रियांना विवाह निबंधक यांनी दिलेला विवाह नोंदणी दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचीत केलेले शासनाकडील राजपत्र संबंधित उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करावे लागेल. |
| १२.१० | फक्त कायम स्वरुपाचे दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांनाच दिव्यांग प्रवर्गाकरीता ठेवण्यात आलेल्या वयोमर्यादेतील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या प्रवर्गाकरीता दिव्यांग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत. |
| १२.११ | दिव्यांग नियुक्तीकरिता संबंधित व्यक्तीने त्या पदासाठी असलेली विहीत अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच त्यापदावर काम करण्यास तो सक्षम असला पाहिजे. सदर दिव्यांग उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा कसे याची तपासणी नियुक्तीपूर्वी वैद्यकीय मंडळाकडून करुन घेण्यात येईल. |
| १२.१२ | नि:समर्थ व्यक्ती (दिव्यांग) व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेल्या सवलतींचा लाभ मिळण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकांकडील नि:समर्थ व्यक्ती (दिव्यांग)चे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच नि:समर्थ व्यक्ती (दिव्यांग) प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे. |
| १२.१३ | खेळाडूंकरीता अर्हता- सदर पदांसाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू अथवा भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धांतील प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान किंवा सुवर्ण रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू अथवा भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रीडा स्पर्धांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय स्थानः किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू अथवा अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा प्रकारामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू, हा खेळाडू आरक्षणासाठी पात्र असेल. राज्य अजिंक्यस्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच ज्या खेळाची नोंदणीकृत राज्य संघटना त्यांच्या अधिकृत राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असेल, तसेच सदर राष्ट्रीय संघटनेला इंडियन ऑलिम्पिक असोशिएशनने संलग्नता दिलेली असल्यास अशा राज्य संघटनेच्या स्पर्धेतील राज्यस्तरीय विजेत्यांनाही खेळाडू आरक्षणाचा लाभ देण्यात येईल. |
| १२.१४ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. राक्रीधो/२००२/६८/क्रीयुसे-२ दि.०१/०१/२०१६ नुसार विहीत केलेले क्रीडा प्रकार खेळाडू आरक्षणाकरिता ग्राहय धरणेत येतील. |
| १२.१५ | खेळाडू उमेदवारांनी वरील नमूद शासन निर्णयातील तरतूदींनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवारास विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील. |
| १२.१६ | उमेदवार माजी सैनिक असल्यास जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ उमेदवारास देय राहणार नाही. तसेच माजी सैनिक, बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणासाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारिरीक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत. |

| | |
|---|---|
| १२.१७ | शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र. २००/२००९/१६ अ. दिनांक २७/१०/२००९ नुसार अंशकालीन उमेदवार या आरक्षणात अर्ज केलेल्या उमेदवारास कागदपत्रे पडताळणीचे वेळी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ उमेदवारास देय राहणार नाही. |
| १२.१८ | शासन निर्णय क्र.विकाक-२२१५/प्र.क्र.३३७/१६- अ, दिनांक ०४/११/२०१६ नुसार प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त या आरक्षणात अर्ज केलेल्या उमेदवारास कागदपत्रे पडताळणीचे वेळी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ उमेदवारास देय राहणार नाही. |
| १२.१९ | शासन परिपत्रक क्र.अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २०/०८/२०१९नुसार , अनाथ या आरक्षणात अर्ज केलेल्या उमेदवारास कागदपत्रे पडताळणीचे वेळी विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभागाकडील अनाथ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ उमेदवारास देय राहणार नाही. |
| १२.२० | जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदसंख्येत/आरक्षणात तसेच भरती प्रमाणात बदल होऊ शकतो.तसेच मागासवर्गीय आरक्षण व ईडब्ल्युएस आरक्षण यांचे बिंदुनामावलीबाबत, भविष्यात शासन निर्णय पारीत झाल्यास अथवा काही बदल झालेस त्यानुसार जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येत बदल होऊ शकतो. व त्या बदलानुसार पदे भरण्यात येईल. |

**१३. इतर सर्वसाधारण अटी/ शर्ती/सूचना :-**

| | |
|---|---|
| १३.१ | पात्रता/आरक्षणासंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे. अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/आरक्षणाचा दावा ग्राह्य समजला जाणार नाही. |
| १३.२ | उमेदवारांना मुलाखतीची / ऑनलाईन परीक्षेची प्रवेशपत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, निवड व प्रतिक्षा सूची व इतर सर्व सूचना ह्या वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. |
| १३.३ | शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि) विभाग, शा.नि.क्र. मातस २०१२/ प्र.क्र. २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०४/०२/२०१३ अन्वये शासनाने विहित केलेले संगणक अभ्यासक्रम/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल. |
| १३.४ | सर्व पदांवरील उमेदवारांना महानगरपालिकेच्या सेवेत रूजू होण्यापूर्वी संबंधित पोलिस यंत्रणेकडून चारित्र्य व पूर्वचारीत्र्य पडताळणी अहवाल ०६ महिने कालावधीत सादर करणे बंधनकारक राहील. चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल प्रतिकूल/अवैध प्राप्त झाल्यास,उमेदवाराची केलेली निवड रद्द करण्यात येईल. व कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. |
| १३.५ | सर्व पदावरील उमेदवारांना महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर.व्ही -२०००/प्रक्र१७/२०००/२०१२,दि. ०१/०७/२००५ अन्वये दि. २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही. तसे विहित नमुन्यात र.रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| १३.६ | उमेदवारांची अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी महापालिकेच्या रुग्णालयामध्ये उमेदवाराची वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये शारीरीक व मानसिकदृष्ट्या तो पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल. मनपा रुग्णालयाने अपात्र ठरविलेस कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ नियुक्ती रद्द करण्यात येईल. |
| १३.७ | उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| १३.८ | उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत. |
| १३.९ | निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती नंतर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व वेळोवेळी होणा-या सुधारणेनुसार सर्व नियम लागू होतील. |
| १३.१० | नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारांनी विहीत केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इत्यादि विशिष्ट स्वरुपात भरुन दिल्याशिवाय महापालिका सेवेत रुजू करुन घेतले जाणार नाही. |
| १३.११ | निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने ऑनलाईन अर्जात व कागदपत्रे पडताळणीचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे,तसेच भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाब आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड/नियुक्ती कोणत्याही टप्प्यांवर रद्द करण्यात येईल.याबाबत न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही. |
| १३.१२ | पात्र उमेदवारांना ऑनलाईन परीक्षा/कागदपत्रे पडताळणीसाठी स्वखर्चाने यावे लागेल. |
| १३.१३ | वरिल सर्व पदांच्या मूळ कागदपत्रे तपासणीवेळी उमेदवाराने सादर करावयाच्या अनुभव प्रमाणपत्रामध्ये नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीमध्ये नमूद अनुभवामधील प्रशासकीय कर्तव्ये व जबाबदा-या यांचे स्वरुप असलेला अनुभव नमूद करणे आवश्यक आहे. |
| १३.१४ | सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/४/१२, दि.०३/०७/२००४ अन्वये नियुक्तीसाठी ज्या पदांकरीता अनुभव आवश्यक आहे,त्या पदांकरीता विहीत केलेनुसार अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. |
| १३.१५ | पिंपरी चिंचवड महापालिकेचे भरती प्रक्रिये दरम्यान मध्यस्थ/ठग पिं.चि.महापालिकेत संबंध असल्याचे भासवणा-या व्यक्ति यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून उमेदवारांनी सावध रहावे.अथवा कोणत्याही प्रकारे फसवणूक झालेस पिंपरी चिंचवड महापालिका जबाबदार राहणार नाही. |

| | |
|---|---|
| १३.१६ | रिक्त पदांचे आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. शासन स्तरावरुन भरतीबाबत वोळोवेळी प्राप्त होणारे शासन आदेश, निर्णय, परिपत्रक तसेच मे.न्यायालयाचे कोणतेही निर्देश विचारात घेऊन, सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेली अर्हता अटी-शर्तीमध्ये बदल करणेचे व भरतीप्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना आहेत. स्पर्धात्मक परीक्षा अथवा भरती प्रक्रीया स्थगित करणे अथवा रद्द करणे, परीक्षेचे स्वरुप,तारीख व ठिकाण बदलण्याचे सर्व अधिकार आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. |

17/08/22

(राजेश पाटील)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८